# जिल्हा परिषदेअंतर्गत पूल व मो-या तपासणी संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना

ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक, क्र.जिपर-२०१६/प्र.क्र.४९३/पंरा-८
सार्वजनिक बांधकाम भवन,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१
दिनांक -: ८ ऑगस्ट, २०१६.

**वाचा :-** १) शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. नं.एमएसआय/३३६६/रा.म.-२, दि.२१.३.१९८८.
२) शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.आरएआर-२००६/प्र.क्र.८/रस्ते-१, दि.२५.१.२००६.
३) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.जिपर-२०१२/प्र.क्र.११८/पंरा-८ दि.१०.९.२०१२.

**प्रस्तावना :-**

जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील ग्रामीण रस्त्यावरील मोऱ्या व पुलांचे निरीक्षण विविध स्तरावरील संबंधित अभियंता यांनी करावयाचे असून शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. एमएसआय/३३६६/रा.म.२, दि. २१ मार्च,१९८८ अन्वये तपासणीबाबत तपशील नमुद केलेला आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेत सुध्दा कार्यवाही करण्यात येत असते.

सन २०१२-१३ च्या आर्थिक वर्षापासून जिल्हा परिषदे अंतर्गत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्ते व पुल दुरुस्ती व परिरक्षण हा कार्यक्रम ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. त्या संदर्भातील सूचना दिनांक १० सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. पुलांची देखभाल व दुरुस्ती तपासणी संदर्भात विविध घटक व प्रतिकूल पर्यावरण यामुळे पुलांकडे विशेष लक्ष पुरविणे आवश्यक आहे. यास्तव पुलांबाबत नियतकालिक अशी परिपूर्ण निरीक्षण पध्दती संदर्भाधिन १ येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २१ मार्च, १९८८ च्या परिपत्रकात विहित केलेल्या पध्दतीनुसार जिल्हा परिषदेअंतर्गत करावयाची निरीक्षणे, तपासणी याबाबत कार्यवाही करण्याबद्दल पुन्हा सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक -**

अलिकडच्या काळात प्रतिकूल पर्यावरण, वाढलेली वाहतूक व इतर नैसर्गिक घटक यामुळे मोऱ्या व पुलाच्या बांधकामाचे निरीक्षण या संदर्भात तांत्रिक स्तरावर विशेष लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. बांधकाम करतांना केलेल्या संकल्पनानुसार मोऱ्या, पुल कार्यरत असल्याची दरवर्षी खात्री करणे आवश्यक आहे. अनपेक्षित घटकामुळे काही बांधकामांना क्षती पोहचण्याची शक्यता असते. यास्तव नित्य नियमाने मोऱ्या व पुलांचे निरीक्षण, देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक ठरले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार पुलांचे निरीक्षण कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी करावयाचे असते. त्यांच्या स्तरावर पावसाळ्यापूर्वी व

पावसाळयानंतर निरीक्षण करावयाचे असते. या अनुषंगाने करावयाच्या निरीक्षणाची वारंवारता आणि कोणत्या स्तरावर निरीक्षण करावयाचे/नोदवह्या ठेवणे याबाबतचा तपशील शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक-एमएसआय-३३६६/रा.म.२, दिनांक २१ मार्च, १९८८ अन्वये विहीत केलेला असून संदर्भाधीन शासन परिपत्रकात नमूद केलेल्या आवश्यक त्या तपासणी सूची व निरीक्षण प्रपत्रे लक्षात घेऊन त्याप्रमाणे आपापल्या जिल्हयातील पुलांचे निरीक्षण/तपासणी कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/उप अभियंता/कार्यकारी अभियंता यांनी करावी व निरीक्षण नोंदवहीत या सर्व बाबी व्यवस्थित नोंदवून ठेवाव्यात. सदर निरीक्षण नोंदवही त्या-त्या स्तरावर ठेवाव्यात. आवश्यक तेथे छायाचित्रांसह तपशील ठेवावा. मोऱ्या-पुल क्षतीग्रस्त, वाहतुकीस धोकादायक आढळल्यास अपघात होणार नाहीत यासाठी आवश्यक ती खबरदारी ( उदा-सूचना फलक, वाहतूक नियंत्रण इ.) घेण्यात यावी. या सूचनांची अंमलबजावणी तात्काळ करावी. या वेळी पावसाळा सुरु झाला असला तरी पावसाळ्यापुर्वी करावयाची तपासणी/निरीक्षणे आता लगेचच करण्यात यावी.

जेथे अधिक्षक अभियंता/मुख्य अभियंता स्तरावर निरीक्षण करणे, निरीक्षण नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक आहे तेथे सदर तपासणी/निरीक्षण, अधिक्षक अभियंता/मुख्य अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांनी करावी. कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद यांनी त्यांचा निरीक्षण अहवाल तपासणीसाठी अधिक्षक अभियंता/मुख्य अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांना सादर करावा. पुल/मोऱ्यांच्या कामामध्ये आढळून आलेले दोष दुरुस्त करण्यासाठी आवश्यकतेनुसार अधिक्षक अभियंता, संकल्प चित्र मंडळ, (पुल) सार्वजनिक बांधकाम विभाग यांची मदत घेता येईल. दरवर्षी घेण्यात येणाऱ्या देखभाल-दुरुस्ती कार्यक्रमात मोऱ्या-पुलांच्या दुरुस्तीचा समावेश करण्याची दक्षता घ्यावी. पुलांची पाहणी व आवश्यक त्या दुरुस्त्या वेळेत व्हाव्यात या दृष्टीने अधिक्षक अभियंता/मुख्य अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांनी, कार्यकारी अभियंता यांनी नमूद केलेल्या पुलांच्या संदर्भात जिल्हा पाहणीच्या वेळी तपासणी नोंदवह्या आवर्जून पहाव्यात. पुलाची पाहणी तसेच दुरुस्त्या या योग्यप्रकारे योग्यवेळी झालेल्या आहेत/होत आहेत याबाबत खात्री करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दि.ग.मोरे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति –

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२. मुख्य अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.) .
३. सर्व अधिक्षक अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.) .
४. अधिक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग), संकल्पचित्र मंडळ, मुंबई/नागपूर.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
६. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद (सर्व).
८. अव्वर सचिव/पंरा-७/कार्यासन अधिकारी(यो.-८,यो-९)
९. निवडनस्ती पंरा-८.